RCS No. 174/2020

**नियमित दिवाणी दावा क्र.१७४/२०२०**
**(समिंद्राबाई जाधव वि. गिताबाई बाबर)**
**निशाणी ३३६ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दाखल केला असून मयत प्रतिवादी क्र.२१ यशोदा विश्वनाथ बाबर यांचे वारस विहीत कालावधीत अभिलेखावर न घेतल्याने मुळ दावा प्रतिवादी क्र.२२ यांचे विरुध्द अबेट झाला असून सदर अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केला आहे की. वादी यांचे कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.२२ या दिनांक २८.०२.२०१२ रोजी मयत झाले असून वादी हे व्यवसायानिमित्त परराज्यात असलेने मयत प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीताचा अर्ज दाखल करण्यास विलंब झाला आहे. प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट ओदश रद्द न झालेस वादी यांचे नुकसान होणार आहे. प्रतिवादी क्र.२२ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळावा अशी वादी यांनी विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन वादींच्या अर्जातील कथने मान्य व कबुल नसल्याचे कथन केले आहे. वादींनी प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास जाणुनबजून विलंब केला आहे. त्यामुळे वादींचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

३. वादी यांनी निशाणी ३३६ वर अर्जाच्या पृष्ठ्यर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.२२ यशोदा विश्वनाथ बाबर यांचा मृत्युदाखला दाखल केला आहे. वादी यांनी मुळ दावा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटपाकरीता व निरंतर ताकीदी करीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२२ यशोदा विश्वनाथ बाबर हे दिनांक २८.०२.२०१२ रोजी मयत झाले आहेत. दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाकरीता द्रव्यदंडावर मंजूर अर्ज करणे न्यायोचित ठरते. त्यामुळे न्याय हिताचे दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश

पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.२२ यशोदा विश्वनाथ बाबर यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट चा आदेश वादी यांनी प्रतिवादी यांना र.रु.२००/- (रक्कम रुपये दोन मात्र) इतका दंड देणेचे अटीवर रद्द करणेत येतो.

३. वादी यांनी प्रतिवादी यांना द्रव्यदंड न दिल्यास प्रस्तुत आदेश रद्द ठरवण्यात येईल.

PALLAVI MANSING SURYAWANSHI

Digitally signed by PALLAVI MANSING SURYAWANSHI
Date: 2025.10.09 10:19:02 +0530

विटा.
दिनांकः- ०७/१०/२०२५

**(श्रीमती पी.एम.सुर्यवंशी)**
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा. जि. सांगली.